# किशोर मासिकाच्या तीस हजार पानांचे 'डिजिटायझेशन'

## १९७१ पासूनचे सर्व अंक मोफत उपलब्ध

प्रतिनिधी, मुंबई

**आठ ते** चौदा या किशोरवयीन मुलांसाठी गेली ४६ वर्षे चालविण्यात येणाऱ्या किशोर मासिकाच्या तीस हजार पानांचे



'डिजिटायझेशन' झाले आहे. १९७१ पासून प्रकाशित झालेल्या 'किशोर'चे सर्व अंक आता माहितीच्या महाजालात आणण्यात आले आहेत. राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) हे मासिक प्रकाशित केले जाते.

१४ नोव्हेंबर १९७१ या दिवशी 'किशोर' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. वसंत शिरवाडकर हे 'किशोर'चे पहिले संपादक होते.

> बालभारतीचे संचालक मगर आणि 'किशोर'चे कार्यकारी संपादक किरण केंद्रे यांना आम्ही हा प्रस्ताव दिला. कोकणातील साखरपा या गावी किशोरच्या डिजिटायझेशनचे काम करण्यात आले. किशोरचे एकूण ५५१ अंक आता माहितीच्या महाजालावर आले आहेत.
>
> – मंदार जोगळेकर, 'बुकगंगा डॉट कॉम'

मराठीतील नामवंत लेखकांचे साहित्य 'किशोर'मध्ये प्रकाशित झाले असून नामवंत चित्रकारांनी 'किशोर'साठी चित्रेही रेखाटली आहेत. 'माझे बालपण', 'माझा गाव', 'चित्रकथा', 'फास्टर फेणे', 'देशांतर' ही सदरे विशेष लोकप्रिय ठरली. मुलांमध्ये शालेय पाठ्यपुस्तकांशिवाय अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे या उद्देशाने 'किशोर' मासिक सुरू करण्यात आले. १९७१ पासून सुरू झालेला हा प्रवास आजही अव्याहतपणे सुरू आहे. बालभारतीच्या http://ebalbharati.in या संकेतस्थळावर 'ई-किशोर' असा विभाग असून यावर 'किशोर' मासिकाचे पहिल्या अंकापासून ते सप्टेंबर २०१७ पर्यंतचे सर्व अंक मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

लोकसत्ता
Tue, 28 November 2017
epaper.loksatta.com//c/24066156